# परिचयपत्र

## नांव: केशवराव जगन्नाथराव मेतकर

मु. खैरखेड पो. खंडाळा ता. अकोट जि. अकोला

- 1982 मध्ये मा. शशिधरदादा खोटरे यांच्या नेतृत्वामध्ये अकोट तालुक्क्यातील खेडोपाडी हींडून लोकांजवळून पुस्तकरुपाने वर्गणी गोळा करुन तालुक्क्यामध्ये एकाच वर्षी ग्रामिण भागात 52ग्रंथालये सुरु करुण महाराष्ट्रामध्ये तालुक्क्याला प्रथम क्रमांक मिळवून दिला.
- 1997 मध्ये स्वतःच्या शेतीत देशात सर्वप्रथम मुव्हेबल ड्रीप ची स्वतःच्या कल्पकतेतून निर्मीती केली आणि भारतातील पहीले मुव्हेबल ड्रीपचे निर्माते ठरले.
- वसंतराव नाइक कृषी पुरस्कार प्राप्त शेतकरी.
- 1998 मध्ये भाऊसाहेब पंजाबराव देशमुखांचा जन्मशताब्दी वर्ष स्वखर्चाने स्वतःच्या शेतात शेतकरी मेळावा घेवून साजरा करणारे पहीले शेतकरी.
- गावातील अतिक्रमित जमिनीचा सामजस्याने ताबा मिळवून त्यावर दोन मिनिटामध्ये 2000 वृक्ष लागवड करुन त्यांचे वर्षभर संगोपण करुन अडीच क्विंटलचा केक कापुन वृक्षांचा पहीला वाढदिवस साजरा करणारे भारतातील पहीले मानकरी.
- गावक-यांकडून 12 एकर जमिन दानरुपाने मिळविली आणि शिर्डी संस्थानकडून एक कोटी रुपयाचा निधी मिळवून त्या जमिनीमध्ये चार चार एकराचे खोदतळे निर्माण केले व गावातील नदीमध्ये जागोजागी बंधा-यांची श्रुंखला तयार करुन फार मोठ्या प्रमाणात जलसंधारनाची कामे करुन विदर्भात राळेगण सिद्धी निर्माण करण्याचा प्रयत्न केला

-------- *** ---------